वनसंरक्षक (प्रादेशिक) सत्यमेव अमरावती


**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**वनसंरक्षक (प्रादेशिक)अमरावती वनवृत्त, कॅम्प अमरावती-४४४ ६०२**

**दूरध्वनी क्र. (०७२१) २६६२०९०/२६६२५९३/२६६२६८०**

**Email ID:** ccftamravati@mahaforest.gov.in /aticcfa@gmail.com


**आदेश क्रमांक:-** 81 **अमरावती-२, दिनांक:-** 5/7/2022

**विषय:-** **लेखापाल संवर्गातून मुख्य लेखापाल संवर्गात पदोन्नती देणेबाबत.**

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे २०२१

०००००

लेखापाल पदावरून मुख्य लेखापाल पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरती पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक १३/१२/२०२१ रोजी संपन्न होऊन विभागीय पदोन्नती समितीच्या सभेत पदोन्नतीस पात्र ठरविण्यांत आलेल्या खालील लेखापाल यांचेवर विभागीय चौकशी प्रकरणी त्यांचेवरील शिक्षेचा कालावधी हा दिनांक ३०.०६.२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याकारणाने शासन निर्णय एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्यासन१२/दिनांक ३० ऑगस्ट २०१८ मधिल तरतुदीनुसार त्यांना मोहोरबंद पाकीटात ठेवण्यात आले होते. आता त्यांचा शिक्षेचा कालावधी संपुष्टात आल्याने दिनांक ४/०७/२०२२ रोजी पार पडलेल्या नागरी सेवा मंडळाने पदस्थापनेच्या बाबतीत केलेल्या शिफारशीस अनुसरुन मुख्य लेखापाल पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरते पदोन्नतीचे आदेश खालील अटीच्या अधिन राहुन निर्गमित करण्यांत येत आहे.

१.०० लेखापाल या संवर्गातून मुख्य लेखापाल संवर्गात सुधारित वेतन संरचनेनुसार वेतन स्तर (एस-१३: ३५४००-११२४००) या वेतनमानात लेखापाल या पदावर खाली नमुद केलेल्या अटीवर **निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात** पदोन्नती देण्यात येत आहे.

१.०१ आपणास देण्यात येणारी पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे २०२१ च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यांत येत आहे. उक्त पदोन्नत्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. तसेच सदर पदोन्नती मुख्य लेखापाल संवर्गातील काही दावे/याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.

१.०२ मुख्य लेखापाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

१.०३ आपली पदोन्नती ही लेखापाल संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणा-या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे त्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासुन जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

१.०४ आपणास देण्यांत आलेली तात्पुरती पदोन्नती कोणतीही पुर्व सुचना वा नोटीस न देता रद्य करण्याचा अधिकार शासन राखुन ठेवीत आहे.

१.०५ या आदेशाद्वारे पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रूजू तारखेला पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल.

१.०६ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२ जुन २०१४ अन्वये पदोन्नती करिता मत्ता व दायित्व याची वार्षिक विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२.०० आपणास वरील नमुद अटी व शर्तीचे अधिन राहुन खुल्या प्रवर्गात **निव्वळ तात्पुरत्या** पदोन्नती नंतरचे मुख्य लेखापाल या पदावर पदस्थापना खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव (सर्वश्री) | लेखापाल पदावरील नियुक्ती प्रवर्ग | सध्या कार्यरत असलेला विभाग | पदोन्नत मुख्य लेखापाल पदाचा प्रवर्ग | मुख्य लेखापाल पदावर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नती नंतरची पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अविनाश मुरलीधर तराळे | खुला | मेळघाट प्रादेशिक वनविभाग, परतवाडा | खुला | उपवनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, विभागीय कार्यालय, आकोट | रिक्त पदी |

३.०० आपणास उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे संमतीपत्र पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतांना सादर करावे.

४.०० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

५.०० पदोन्नती पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव वापरल्यास त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

(जी.के.अनारसे)
वनसंरक्षक
(प्रादेशिक) अमरावती

क्रमांक:-कक्ष-८/आस्था/मु.ले.पदो./ 994 /२०२२-२३
अमरावती-२, दिनांक:- 5/7/2022

प्रति,
अविनाश मुरलीधर तराळे
मार्फत :- उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रा) वनविभाग, परतवाडा



D:\Bhagyashri\CCF-T\Promotion\Promotion_2020\Accountant to HC Promotion\Acct. to HC Promotion order 20-21.docx

प्रतिलीपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलीपी:- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.

प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक, मेळघाट (प्रादेशिक) वनविभाग, परतवाडा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी उक्त शासकीय सेवकांना त्यांचे पदोन्नतीचे जागेवर रूजू होण्यासाठी स्थानिक व्यवस्था करून संबंधित लेखापाल यांना तात्काळ कार्यमुक्त करावे व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, आकोट यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी संबंधित कर्मचारी रूजू झाल्यानंतर तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. पदोन्नती नंतर संबंधित कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होत नसेल तर अशा कर्मचा-याविरुध्द सक्षम प्राधिकारी यांनी नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

प्रतिलीपी:- "आदेश फाईल"